महाराष्ट्र शासन
• वन विभाग •

दुरध्वनी क्रमांक : 02527/272096
फॅक्स क्रमांक : 02527/272096
ईमेल : dcfshahapur@gmail.com,
dycfshahapur@mahaforest.gov.in

# उप वनसंरक्षक, शहापूर वनविभाग, शहापूर यांचे कार्यालय

शहापूर-आसनगांव रोड, जूना आग्रारोड, आसनगांव, मु.पो.ता. शहापूर, जि. ठाणे 421 601

क्रमांक - कक्ष-6(3)/20/जमीन/ ९४८६ /2022-23 दिनांक 2६/08 / 2022

प्रति,

मे. जेएसडब्ल्यु एनर्जी पीएसपी टु लि.,
जेएसडब्ल्यु सेंटर, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व) मुंबई - 400 051.

विषय:- Diversion of Forest Land for Bhavali Pumped Storage Project (1500 MW) in Thane & Nasik Districts of Maharashtra State. (FP/MH/HYD/153240/2022)

संदर्भ:- 1) आपलेकडील दिनांक 19/04/2022 रोजीचे पत्र
2) आपलेकडील दिनांक 09/03/2022 रोजीचे पत्र
3) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-6(3)/20/जमीन/269/22-23, दिनांक 02/05/2022
4) आपलेकडील दिनांक 19/07/2022 रोजीचे पत्र

विषयांकित प्रकरणी 1500 MW भावली पंप स्टोरेज प्रोजेक्ट (PSP) करीता आवश्यक असलेल्या ठाणे जिल्हयातील शहापूर वनविभागाचे कार्यक्षेत्रातील मौजे कळभोंडे व मौजे कोथळे, ता. शहापूर येथील एकुण 150.23 हे.आर व नाशिक जिल्हयातील नाशिक पश्चिम वनविभागाचे कार्यक्षेत्रातील मौजे जामुंडे, ता. इगतपूरी येथील एकुण 62.42 हे.आर असे एकुण एकंदर 212.65 हे.आर वनजमीनीचे वळतीकरणास केंद्र शासनाची मंजूरी मिळणेकामी आपण वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम 2 अंतर्गत प्रस्ताव सादर केलेला असून सदर प्रस्तावाचा सांकेतांक क्रमांक FP/MH/HYD/153240/2022 असा आहे. सदर प्रस्तावाची Hard Copy प्रत आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास सादर करणेत आली आहे. त्यास अनुसरुन आपणांकडून प्राप्त Hard Copy प्रत व ऑनलाईन सादर करणेत आलेल्या प्रस्तावाची पडताळणी केली असता सदर प्रस्तावामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास येत आहेत.

1) विषयांकित प्रस्तावाकामी आवश्यक असलेल्या वनजमिनीचा बाबनिहाय तपशिल सोबतचे प्रपत्रामध्ये सादर केलेला नाही.
2) सदर प्रस्तावाचे सामंजस्य कराराची (MoU) प्रत जोडलेली आहे. तथापि सदर प्रस्तावाची तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी प्रस्तावासोबत जोडलेली नाही.
3) विषयांकित प्रस्तावांतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावित एकुण 212.65 हे.आर वनजमिनीचे मोबदल्यात पर्यायी वनीकरणासाठी मौजे दुर्गेवाडी खुर्द, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथील एकुण 220.58 हे.आर वनेत्तर जमीन

उपलब्ध करुन देणेत येणार असल्याबाबत नमूद केले आहे. तथापि पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित एकुण 220.58 हे.आर वनेत्तर जमिनीचे संबंधित उप वनसंरक्षक यांचेकडील Suitability Certificate, पर्यायी वनीकरणाची 10 वर्षाची योजना व अनुषंगिक दस्तऐवज प्रस्तावासोबत जोडणेत आलेले नाहीत.

4) विषयांकित प्रस्तावाकामी आवश्यक असलेल्या Environmental Clearance प्राप्त करुन घेणेकामी दाखल केलेल्या अर्जाची प्रत प्रस्तावासोबत जोडलेली नाही.

5) ऑनलाईन सादर करणेत आलेल्या प्रस्तावासोबत वळतीकरणासाठी प्रस्तावित वनजमिनीची बाबनिहाय, Properties दर्शविणारी KML जोडणेत आलेली नाही.

6) प्रस्तावासोबत Catchment Area Treatment Plan जोडलेला नाही.

तरी आपणांस कळविण्यांत येते की, प्रकरणी वर नमूद बाबींची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास फेर सादर करावा, जेणेकरुन सदर प्रकरणी पुढील संस्करण करणे सोयिस्कर होईल.

(सचिन रेपाळ)
उप वनसंरक्षक
शहापूर वनविभाग, शहापूर

प्रतिलिपी:- उप वनसंरक्षक, पश्चिम नाशिक यांजकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

# AREA STATEMENT

## DETAILS OF ITEMWISE FOREST LAND AND NON FOREST LAND REQUIRED FOR THE PROJECT

| Item of Work | Name of Village | Details of Forest Land | | | | | | | Legal Status of land | Details of Non Forest Land | | | | | | Total Area Ha. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Gut No. | Survey No. | Comp. No. | Length (mtr) | Width (mtr) | Area Sq.m. | Area Ha. | | Gut No. | Survey No. | Length (mtr) | Width (mtr) | Area Sq.m. | Area Ha. | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| Total | | | | | | | | | | | | | | | | |